# प्रकरण 6

## मध्यवर्ती मराठी कथेचा गोमंतकीय कथेवर असलेला प्रभाव


**6.1 प्रस्तावना ........................................................................................................ 341**

**6.2 विषयकेंदीय प्रभाव आणि सहसंबंध .......................................................................... 341**

**6.3 मध्यवर्ती मराठी कथासाहित्याच्या तुलनेत समकालीन गोमंतकीय कथेच्या मर्यादा............. 348**

**6.4 मध्यवर्ती व गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री कथालेखन : प्रभाव व भेद ..................................... 352**

**6.3 तंत्रनिष्ठ प्रभाव आणि भेद................................................................................... 355**

**6.5 गोमंतकीय मराठी कथेची वैशिष्ठ्ये बलस्थाने : मध्यवर्ती कथेच्या तुलनेत............................ 358**

**6.6 समारोप ........................................................................................................ 359**

**संदर्भ ............................................................................................................ 360**

# प्रकरण 6

# मध्यवर्ती मराठी कथेचा गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव

## 6.1 प्रस्तावना

प्रत्येक व्यक्ती हा दुसऱ्या व्यक्तीपेक्षा वेगळा असतो. ज्या समाजात तो राहतो, त्याची जडणघडण होते, त्याचा प्रभाव त्याच्यावर पडलेला असतो आणि प्रत्येक व्यक्तीवर पडणारा प्रभाव वेगळा असतो म्हणून प्रत्येक व्यक्ती ही वैशिष्ट्यपूर्ण असते. साहित्य क्षेत्रात प्रभावामुळे ग्रामीण, आदिवासी, दलित, स्त्रीवादी, महानगरीय असे विविध साहित्य प्रवाह निर्माण झाल्याचे दिसून येतात. लेखकांमध्ये शाब्दिक - अशाब्दिक, वाङ्मयीन – अवाङ्मयीन, सांस्कृतिक, सामाजिक, भाषिक भिन्नता असूनही साहित्यामध्ये साधर्म्य आढळते. एका लेखकाचा दुसऱ्या लेखकावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे प्रभाव पडलेला असतो. कधी हा प्रभाव लेखकाच्या भाषेवर, शैलीवर कधी रचनेवरही असू शकतो. विचार, मत, संकल्पना अशा गोष्टींचा स्वीकार करणे हा प्रभावाचा हेतू असतो. प्रभाव व नकल यात फरक असतो कारण नकल जाणीवपूर्वक केली जाते तर प्रभाव हा अजाणतेपणी, अभ्यासातून स्वीकारला जातो. नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेचा नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर असलेला प्रभाव समजून घेत असताना गोमंतकीय कथालेखनात आलेल्या भिन्न जाणिवांचा विचार करावा लागतो. गोवा मुक्तीपूर्वकाळापासून गोमंतकीय कथा लेखन हे मध्यवर्ती मराठी कथेला समांतर चालत आल्याचे दिसून येते. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा व मध्यवर्ती मराठी कथा ही समांतर जाणारी आहे का? हा विचार करणे गरजेचे ठरते.

## 6.2 विषयकेंद्रीय प्रभाव आणि सहसंबंध

१९९० नंतरच्या कालखंडाचा विचार करत असताना जागतिकीकरणामुळे आधुनिक जगण्यात उमटलेले बदलांचे पडसाद साहित्यातून दिसून येतात. नव्वदोत्तरी कालखंडात आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक अशा सर्व क्षेत्रात परिवर्तने झालेली आहेत आणि साहजिकच या परिवर्तनाचे पडसाद साहित्यातून उमटलेले आहेत. विज्ञान तंत्रज्ञानात झपाट्याने होणाऱ्या बदलांमुळे माणसाच्या जीवनमानात प्रचंड प्रमाणात बदल झालेले आहेत. चंगळवादी संस्कृती फोफावल्यामुळे सुखासीन जगण्याकडे आकर्षिला जाणारा आजचा माणूस, आज रुजलेली मॉल संस्कृती, १९९० नंतर भारताने स्वीकारलेल्या आर्थिक धोरणामुळे निर्माण

झालेली मुक्त अर्थव्यवस्था, बहुराष्ट्रीय कंपन्यांचे भारतात आगमन इत्यादी कारणांमुळे भारतीय माणसाला जगाची कवाडे उघडलेली आहेत व माणूस पाश्चात्य संस्कृतीशी आकर्षित होत आहे. ग्रामीण भागात सुधारणा होत असल्याने त्याचे साधक बाधक परिणाम ग्रामीण जीवनावर होत आहे. गावागावात निर्माण झालेली अशांतता, भाऊबंदकीचा प्रश्न, माणसामाणसांमध्ये निर्माण झालेला तुटलेपणा, ग्रामीण भागात भरडला जाणारा शेतकरी वर्ग, शेतकऱ्याचे कर्जबाजारी होणे व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या आत्महत्या, पर्यावरणीय बदलांमुळे निर्माण होणारी दुष्काळग्रस्त स्थिती, वाढलेल्या दंगली, जातीयता, संवेदनहीनता, सत्तेचे राजकारण, भ्रष्टाचार, डिजीटल माध्यमांमुळे निर्माण झालेले प्रश्न, आभासीविश्व, नातेसंबधात निर्माण झालेली दरी, स्त्रियांचे जीवन असे अनेक प्रश्न या कालखंडात निर्माण झालेले दिसून येतात.

नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेत १९९० पूर्व कालखंडात लेखन करणारे रा. रं. बोराडे, रंगनाथ पठारे, मनोहर शहाणे, ह. मो. मराठे, भास्कर चंदनशिव इत्यादी लेखक १९९० नंतरच्या कालखंडातही लेखन करताना दिसून येतात. या कालखंडातील ग्रामीण कथेचा विचार करणे गरजेचे ठरते. जागतिकीकरणामुळे ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण ही कथा करते. ग्रामीण भागातील शेतकऱ्याच्या समस्या, कुटुंबव्यवस्थेत निर्माण झालेले प्रश्न, ग्रामजीवनातील वास्तव चित्रण इत्यादी विषय आसाराम लोमटे, किरण गुरव, प्रभाकर हरकळ, सदानंद देशमुख इत्यादी लेखकांच्या कथेतून दिसून येतात. १९६० - ७५ दरम्यान लेखनाला सुरूवात करत १९९० सातत्याने लेखन करणारे काही कथाकार तसेच नव्वदोत्तरी कालखंडातील कथाकारांनी ग्रामीण मराठी कथेला नवीन वाट, नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला. ग्रामीण विनोदी कथेचा विस्तार करणारे महत्त्वाचे लेखक रा. रं. बोराडे यांचा विचार करावा लागतो. त्यांच्या कथेत रंजनप्रधानता जरी असली तरी ग्रामीण वास्तवाला, ग्रामजीवनातील परिवर्तनाला भिडण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यांच्या कथेने स्वीकारलेल्या वेगळया वळणाचा प्रत्यय ‘कणसं आणि कडबा’ या कथासंग्रहात आला. “त्यांची कथा आत्मभानाने आणि वैचारिक जाणिवेने प्रगल्भ झालेली दिसते. कथालेखनात कथेच्या कलात्मकतेबरोबरच सामाजिक, आर्थिक प्रश्नांनाही महत्त्व दिल्याचे लक्षात येते. त्यांच्या मूळ प्रकृतिधर्मानुसार नात्यागोत्याचे नवे संदर्भ आलेले आहेतच, पण त्याचबरोबर शेती विषयक काही प्रश्नांना त्यांनी आपल्या कथेत स्थान दिलेले आहे.”.[1] असे त्यांच्या कथेविषयीचे मत डॉ. कानडजे नोंदवतात. मराठी ग्रामीण कथेतील प्रमुख कथाकार म्हणून आनंद यादव यांच्या कथेचा विचार करावा लागतो. त्यांचे ‘खळाळ’, ‘मातीखालची माती’, ‘उखडलेली झाडे’, तसेच ‘झाडवाटा’ (२०००) हा संग्रह प्रकाशित झाला. ग्रामीण समाजजीवनातील वास्तवाचा वेध घेणारी ही कथा सर्वसामान्य माणसांच्या सुख-दुःख, दारिद्र्याचे तसेच

कृषी संस्कृतीचे प्रभावी चित्रण करणारी कथा ठरली. त्यांनी मनोविश्लेषणात्मक स्वरूपात कथा लिहून ग्रामीण जीवनानुभव जिवंत करण्याचा प्रयत्न केला. याविषयी रवींद्र ठाकूर लिहितात,''शंकर पाटलांच्या कथेत ग्रामीण माणसांच्या मनाविषयी लेखक बोलत होता, तर यादवांच्या कथेत स्वतः ग्रामीण माणूसच बोलू लागला. शंकर पाटील क्वचित पात्रांच्या व्यक्तित्वाशी समरस होऊन प्रथम पुरुषी निवेदन पद्धतीने त्यांच्या भावभावना शब्दरूप करत होते. परंतु यादवांनी पात्रांनाच बोलायला लावले.''[2]

भास्कर चंदनशिव हे महत्त्वाचे ग्रामीण कथाकार म्हणून ओळखले जातात. त्यांचे 'जांभूळ', 'मरणकळ', 'अंगारमाती' असे संग्रह नव्वदोत्तरी कालखंडात प्रसिद्ध झाले. मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त स्थिती, भयंकर उन्हामुळे सततचा कोरडा दुष्काळ, यात करपून गेलेली मानसिकता व दारिद्र्याचे चित्रण त्यांच्या कथेने केले. त्याचबरोबर भास्कर चंदनशिव यांच्या कथेमध्ये दलित स्त्रियांवर होणाऱ्या अन्याय अत्याचारांचे चित्रणही दिसून आले. आपल्या अर्थव्यवस्थेत आणि राजकीय व्यवस्थेत भांडवलशाहीमध्ये शेतकऱ्याची होणारी फसवणूक, पिळवणूक याचे चित्र त्यांच्या कथेतून दिसून आले. परिस्थितीनुसार माणसाच्या वागण्याच्या अनेक छटा त्यांनी आपल्या कथेतून चित्रित केल्या. सहकारी साखर कारखाने, कापूस केंद्रे, बँक व सहकारी सोसायटीतून शेतकऱ्याच्या शोषणाचे तसेच जागा होणारा शेतकरी, संप, उपोषण, मोर्चा इत्यादी मार्गांचा अवलंब करतो अशा पद्धतीने आजच्या शेतकऱ्याचा संघर्ष त्यांच्या कथेमध्ये दिसून आला. ऊस उत्पादकांचा, ऊसतोड करणाऱ्या कामगार जीवनाचा प्रश्न ग्रामीण कथेत आणण्याचा प्रयत्न त्यांनी केला. भास्कर चंदनशिव यांच्या कथालेखनामुळे ग्रामीणत्व आणि दलितत्वाच्या सीमारेषा धूसार झाल्याचे चित्र दिसून आले. चंद्रकांत नलगे यांनी 'सरकारी माणूस', 'पंढरीची वाट', अक्रीत आणि आगराळ' असे संग्रह प्रकाशित केले. ही कथा ग्रामीण समस्यांवर भाष्य करते. राजकारणामुळे ग्रामीण माणसाच्या झालेल्या कोंडीचे चित्रण करणारी ही कथा विज्ञानामुळे झुरत चाललेली बलुतेदारी, सर्वसामान्यांची कुचंबणा, कौटुंबिक ताणतणाव इत्यादींचे वास्तव चित्रण करते. स्वातंत्र्योत्तर काळातील कुळ कायदा आणि त्यामुळे गावगाड्यात झालेल्या बदलांचे चित्रण करणारी ही ग्रामीण कथा ग्राम कथेला वेगळे वळण लावताना दिसून येते. बाबाराव मुसळे यांचे 'झिंगु लुखूलुखू', 'मोहरलेला चंद्र' असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथेतून सहकारी संस्था, वेतन कायदा, राजकारण, भ्रष्टाचार अशा अनेक समस्यांमुळे ग्रामीण माणसाची होणारी पिळवणूक, ग्रामीण स्त्रीचे दुःख, कौटुंबिक नात्यातील ताण तणाव, ग्रामीण माणसाच्या भिन्न वृत्ती प्रवृत्ती असे एकूण ग्रामजीवनातील वैयक्तिक आणि सामाजिक पातळीवरील दुःख कथेतून व्यक्त होताना दिसून येते. त्यांच्या कथेत ग्रामीण दलितांच्या जीवनावर तसेच हिंदू मुस्लिम धार्मिक संघर्षावरही

प्रकाश टाकलेला दिसून येतो. वासुदेव मुलाटे यांचे ‘व्यथाफूल’, अंधारंग’, ‘ॲबॉर्शन आणि इतर कथा’, ‘काळोखवेणा’ इत्यादी संग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या काही कथांमधून नागरी जीवन चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे तसेच त्यांच्या बऱ्याचशा कथा ग्रामीण जीवनातील विविध वेदना व्यथा मांडण्याचा प्रयत्न करताना दिसून येतात. पावसा अभावी दुष्काळाला सामोरे जाणारा ग्रामीण माणसाचा कोंडमारा आणि त्यामुळे शेतकऱ्याच्या वाट्याला येणाऱ्या आत्महत्या इत्यादी दाहक अशा वास्तवाचे चित्र वासुदेव मुलाटेंच्या कथेतून दिसून येते. नागनाथ कोत्तापल्ले यांनीही नागरी व ग्रामीण जीवनाचे समर्थपणे चित्रण केलेले आहे. ‘रक्त आणि पाऊस’ हा त्यांचा महत्त्वाचा नव्वदोत्तरी कथासंग्रह. त्यांच्या कथेत बदलत्या खेड्यांचे परिणाम पात्रांच्या माध्यमातून वाचकांना जाणवतात. मराठवाड्यातील दुष्काळ स्थिती आणि पाऊस पडावा म्हणून रूढ झालेल्या लोकधारणांचे वर्णन या कथेमधून येते. सदानंद देशमुख यांनी वैदर्भीय  ग्रामीण जीवन आपल्या कथेतून चित्रित करण्याचा प्रयत्न केलेला आहे. सर्वसामान्य माणसाच्या अगतिकतेचे, शेतकऱ्यांच्या भिन्न प्रश्नाचे, भ्रष्टाचारी स्वार्थी अशा राजकीय नेतृत्वाचे तसेच बदलत्या शिक्षण व्यवस्थेचे विषय त्यांच्या कथेमध्ये आलेले दिसून येतात. बदलते खेडे आणि माणसांच्या भिन्न बदलत्या प्रवृत्तींचे चित्रण त्यांच्या कथेत होताना दिसते. शेतकऱ्यांच्या शोषणाचे नवे संदर्भ त्यांच्या कथेतून दिसून येतात तसेच एकूण तत्कालीन ग्रामीण जीवनातील प्रश्नावर भाष्य करणारी ही कथा ठरते. श्रीराम गुंदेकर या मराठवाड्यातील ग्रामीण कथाकारांचे ‘उचल’, ‘लगाम’ असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. शेतकऱ्यांच्या पिळवणुकीचे चित्र अत्यंत उत्कटपणे त्यांनी आपल्या कथेतून मांडलेले आहेत. बँक, सहकारी सोसायटी, सरकारी कार्यालय यांच्याद्वारे शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाचे चित्रण, नोकरी मिळाल्यानंतर ग्रामीण भागातील तरुणांमध्ये होत असलेल्या बदलाचे चित्रण, त्याचप्रमाणे परंपरागत जीवनाला बळी न पडता शोषणाची बंधने झुगारून देणारा तरुण वर्ग असा एकूण आशावादी क्रांतिकारी सूर त्यांच्या कथेतून दिसून येतो. “श्रीराम गुंदेकर यांच्या कथेतून मराठी कथेला गवसलेले अनेक विषय येतात. शोषण करणारा वर्ग आणि शोषित वर्ग यांच्यातील अंत:संघर्ष कमालीच्या सामर्थ्याने आणि टोकदारपणे त्यांची कथा टिपते”.[3] राजन गवस ग्रामसंस्कृती, ग्रामीण भागात निर्माण होणारी नवीन मूल्यव्यवस्था व नवीन मूल्यांचा प्रतिकार आपल्या कथेतून करताना दिसून येतात.

नव्या पिढीतील एक आश्वासक कथालेखन म्हणून जगदीश कदम यांच्या कथेचा विचार करावा लागतो. त्यांचा ‘मुक्कामाला फुटले पाय’ हा कथासंग्रह प्रसिद्ध झाला. शेतकरी, शेतमजूर, अडाणी स्त्री, दलित स्त्री समस्या, राजकारण करणारे पुढारी अशा पद्धतीने गावातील सामाजिक, राजकीय, आर्थिक व शैक्षणिक

समस्यांचा लेखाजोखा त्यांनी आपल्या कथेतून मांडलेला दिसतो. उद्ध्वस्त झालेल्या ग्रामीण समाजाच्या कथा आसाराम लोमटेनी मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांचे ‘इडा पीडा टळो’, ‘आलोक’ असे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. खेड्यातील भीषण असे वास्तव त्यांच्या कथालेखनातून उमटू लागले. ग्रामजीवनातील राजकारण, भ्रष्टाचार, कर्जबाजारीपणा, दुष्काळ, शेतमालाच्या किमतीत होणारी घसरण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या अशा अनेक समस्यांवर त्यांनी लेखन केले. प्रभाकर हरकळ यांचा ‘भूमिया’ (२०००) हा संग्रह प्रकाशित झाला. शेतीतील आधुनिक यंत्रामुळे कोंडीत सापडलेल्या शेतकऱ्याचे चित्र त्यांच्या कथेमधून दिसून आले. त्याचप्रमाणे शेतकऱ्यांच्या दयनीय अवस्थेचे प्रभावी चित्र त्यांच्या कथेमधून मांडण्याचा प्रयत्न झाला. दुष्काळ, सरकारी कारखाने, बँका, आधुनिक यंत्रे, भ्रष्टाचार इत्यादी गोष्टींमुळे शेतकऱ्याची होणारी कुचंबणा त्यांच्या कथेतून दिसून येते. उत्तम बावस्कर यांनी ‘इस्फोट’ (२०००) हा कथासंग्रह  लिहिला. शेतकऱ्यांच्या जगण्यात आलेला कर्जबाजारीपणा कुटुंबातील प्रश्न व बँकांच्या तगाद्यामुळे असह्य होत आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची उपेक्षा मांडण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते.

द. ता. भोसले यांनी आपल्या कथेतून ग्रामीण जीवनातील स्वातंत्र्योत्तर काळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक बदलांवर भाष्य करण्याचा प्रयत्न केला. “त्यांच्या कथेत ग्रामीण समाजातील जोगतिणींच्या आशा आकांक्षा, दारिद्र्य, असहाय माणसे, जातीय मानसिकता, बेकारीमुळे येणारी उद्विग्नता, ग्रामीण कुटुंब, शेतमजूर, पती-पत्नी यांच्या भावभावनांचा चपखलपणे ठाव घेऊन व्यक्तिचित्रणातील जिवंतपणा वाचकांच्या लक्षात आणून दिला आहे. त्यांनी शहर आणि खेडे यातील मूल्यविषयक जाणिवा व्यक्त करताना तत्त्वज्ञान मांडले असले तरी कथेला प्रचारकी होऊ न देता सामाजिक वास्तवाचा उत्कट अनुभव साकार केला आहे.”[4] ग्रामीण भागातील अनेक समस्यांची उकल करणारी द. ता. भोसले यांची कथा ठरते. बा. ग. केसरकर यांचा ‘डव्हाळं’ हा महत्त्वाचा कथा संग्रह. त्यांच्या कथेत ग्रामीण राजकारण आणि शासकीय योजनांमुळे ग्रामीण माणसावर होणाऱ्या परिणामाचे चित्रण करत श्रीमंताकडून शेतमजुरांच्या होणाऱ्या शोषणाचे चित्र येते. केसरकर यांनी स्त्री दुःखाची अनेक रूपे मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे. कृष्णा इंगोले यांच्या कथेत बदलत्या काळातील माणदेशाचे चित्रण केलेले आहे. स्त्रीची घुसमट, दलितांची उपासमार, फसल्या गेलेल्या शेतकऱ्यांच्या व्यथाही ते मांडतांना दिसून येतात. शेतीकडे बघण्याचा जुन्या नव्या पिढीचा दृष्टिकोन आणि त्यातून निर्माण होणारा दोहोंमधला संघर्ष अनंत भोयर यांनी आपल्या ‘हराळी’ या कथासंग्रहातून मांडलेला आहे. शेतीकडे काळी आई म्हणून बघणारी जुनी पिढी व शेती विकून उद्योग व्यवसाय करण्यासाठी प्रयत्नशील असलेली नवीन पिढी असा हा संघर्ष त्यांच्या

कथेतून येताना दिसतो. शेतकरी वर्गाच्या मनाच्या झालेल्या घालमेलीचे चित्रण त्यांची कथा करते. ग्रामीण जीवनातील स्थित्यंतरांचे चित्र मोहन पाटील आपल्या कथेतून करतात. राजकारण, राजकीय पुढारी यामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांची होणारी कोंडी ते दर्शवितात. भ्रष्ट व्यवस्थेमुळे तरुण शेतकऱ्यांच्या प्रकट होणारा विद्रोह यांच्या कथेत जाणवतो. पांडुरंग कुंभार यांच्या 'पावलट' या कथा संग्रहातून दोन पिढ्यातील मूल्यांचा संघर्ष दिसून येतो. शंकर सखाराम 'झोंज' या कथा संग्रहातून समकालीन समाजवास्तवाचे चित्रण करताना दिसतात. गावातील नैसर्गिक सौंदर्य पालटून आलेला भकासपणा. माळरान नष्ट करून कारखाने उभारल्याकारणाने होणारे प्रदूषण कथेतून दर्शवतात. सामाजिक, राजकीय, भौतिक बदलामुळे ग्रामीण भागातील समाजजीवनावर झालेल्या परिणामांचे चित्र उत्तम बंडू तुपे यांची कथा करते. मीना कदम ग्रामीण कथेविषयी लिहितात, "स्वातंत्र्योत्तर काळात जन्मलेली व तारूण्यात पदार्पण केलेली पिढी बेकार बनून दिशाहीन अवस्थेत फिरत होती. या उद्रेकाचा स्वर इ.स. १९७५ नंतरच्या ग्रामीण साहित्यात उमटू लागला आणि इ.स. १९९० ते इ.स. २०१० च्या काळातील ग्रामीण कथेने गांभीर्याने विद्रोहाचा सूर आळवायला सुरूवात केल्याचे जाणवते."[5]

- नव्वदोत्तरी कालखंडात ग्रामजीवनात झालेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, सांस्कृतिक परिवर्तनावर १९९० नंतरची ग्रामीण कथा भाष्य करते.
- १९९० पूर्व कालखंडात लिहिणारे रा. रं. बोराडे, रंगनाथ पठारे, मनोहर शहाणे, भास्कर चंदनशिव इत्यादी लेखक नव्वदोत्तरी कालखंडातही लेखन करताना दिसून येतात.
- नव्वदोत्तरी कालखंडातील कथाकारांनी ग्रामीण मराठी कथेला नवीन वाट व नवा आयाम देण्याचा प्रयत्न केलेला आहे.
- ही कथा ग्रामजीवनातील वास्तवाचा वेध घेत सर्वसामान्य माणसांच्या दुःख दारिद्र्याचे चित्रण करताना दिसून येते.
- नव्वदोत्तरी ग्रामीण कथेतून मराठवाड्यातील दुष्काळग्रस्त परिस्थिती आणि दारिद्र्याचे चित्रण आलेले दिसून येते.
- बँक, सरकारी सोसायटींमुळे शेतकऱ्यांचे होणारे शोषण तसेच त्यांचा संप, उपोषण, मोर्चा इत्यादी मार्गाने होणारा संघर्ष नव्वदोत्तरी ग्रामीण कथेतून दिसून आलेला आहे.

- राजकारणामुळे ग्रामीण माणसाची झालेली कोंडी, कौटुंबिक ताण तणाव इत्यादींचे चित्रण या कथेमधून दिसून येते.
- वासुदेव मुलाटे, नागनाथ कोत्तापल्ले या कथाकारांच्या कथेतून नागरी व ग्रामीण जीवनाचे समर्थपणे चित्रण केलेले दिसून येते.
- नैसर्गिक परिवर्तनामुळे दुष्काळाला सामोरे जाणारा शेतकरी, शिक्षणामुळे गावात होणारे बदल, सहकारी सोसायट्या, बँका, सरकारी कारखाने, आधुनिक यंत्रे इत्यादींमुळे शेतकऱ्याची होणारी कुचंबणा तसेच कर्जबाजारी झालेल्या शेतकऱ्यांच्या वाट्याला येणाऱ्या आत्महत्या अशा दाहक वास्तवाचे चित्र ही कथा करते.
- ग्रामीण भागातील बदलांना सामोरे जाणाऱ्या तरुणाचा संघर्ष नव्वदोत्तरी कथेमधून दिसून येतो.
- नव्वदोत्तरी ग्रामीण कथा शोषण करणारा वर्ग व शोषित वर्ग यामधील संघर्ष मांडताना दिसून येते.
- नव्वदोत्तरी कथेत ग्रामीण जीवनातील दलितांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न झालेला आहे.
- ग्रामीण स्त्रीचे दुःख व घुसमट नव्वदोत्तरी कथेमध्ये मांडलेले दिसून येते.
- नव्वदोत्तरी ग्रामीण कथेमध्ये दोन पिढी मधील संघर्ष दिसून येतो. तसेच पारंपारिक मूल्ये व आधुनिक मूल्यांचा संघर्षही या कथेतून दिसून येतो.
- नव्वदोत्तरी ग्रामीण कथा खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण, बाजारीकरणामुळे निर्माण झालेल्या ग्रामीण समस्यांवर भाष्य करते.
- नव्वदोत्तरी ग्रामीण कथा ही शोषणाविरुद्ध संघर्ष करत विद्रोही होत चाललेली दिसते.

कथा लेखन परंपरेचा विचार केल्यास, कथा लेखनाच्या सुरूवातीच्या टप्प्यापासून गोमंतकीय मराठी कथा ही मध्यवर्ती मराठी कथेला समांतर जाणारी दिसून येते. साठोत्तरी कालखंडात निर्माण झालेल्या ग्रामीण प्रवाहाच्या प्रभावातून गोवा मुक्तीनंतरच्या कालखंडातील व त्यापुढील १९९० नंतरची गोमंतकीय मराठी कथा ग्रामीण लोकजीवन, रूढी परंपरा, समजुती, मनोवृत्ती, बदलते समाजजीवन, कृषीसंस्कृतीचे चित्रण करताना दिसून येते. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत ग्रामीण जीवनातील कुळवाड्यांच्या व्यथा, कुळ मुंडकार व्यवस्थेत निर्माण झालेल्या शोषित वर्गाचे चित्रण आलेले दिसून येते. नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेत आलेला भाऊबंदकीचा

प्रश्न, कौटुंबिक ताणताणाव, राजकारण, पारंपारिक मूल्ये जपणारी जुनी पिढी व आधुनिक मूल्यांकडे ओढली जाणारी नवीन पिढी असा संघर्ष मिलिंद म्हामल, विठ्ठल गांवस या कथाकारांच्या लेखनातून आलेला दिसून येतो. तसेच गोमंतकीय ग्रामीण स्त्री जीवनातील प्रश्न, तिच्या व्यथा इत्यादींचे चित्रण विठ्ठल गांवस, दयाराम पाडलोस्कर या कथा लेखकांच्या कथेतून दिसून येते.

## 6.3 मध्यवर्ती मराठी कथासाहित्याच्या तुलनेत समकालीन गोमंतकीय कथेच्या मर्यादा.

नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथा गोमंतकीय शेतकरी, शेतीपद्धती, कृषिजीवनाशी निगडीत प्रश्न, कुळ मुंडकार व्यवस्थेतील प्रश्न इत्यादी विषयांना समावून घेताना दिसून येते. मध्यवर्ती ग्रामीण कथाही कृषीसंस्कृतीशी निगडीत प्रश्नांना वाचा फोडते. शेतकऱ्यांच्या आत्महत्या, बँक, सरकारी सोसायट्यांमुळे शेतकऱ्यांचे होणारे शोषण त्यामुळे संप, उपोषण, मोर्चे या माध्यमातून व्यक्त झालेला विद्रोह, शोषण करणारा व शोषित वर्ग यामधील संघर्ष असे भिन्न अनुभव, विद्रोह व संघर्षाच्या पातळीवर वाचकांपर्यंत पोहोचते. गोमंतकीय कथेतील ग्रामजीवन व कृषीसंस्कृतीशी निगडीत प्रश्न हे जीवनचित्रणापुरते मर्यादित राहिल्याचे आपल्याला दिसून येते. अनुभवांची, व्यथांची उत्कट मांडणी असली तरी अनुभवांची तीव्रता, विद्रोह, संघर्ष इत्यादी गोष्टी नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत प्रभावी होताना दिसत नाही. उदा. विठ्ठल गांवस, गजानन रायकर, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई इत्यादी कथाकारांच्या लेखनातून कुळवाड्यांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न झालेला दिसून येतो. गजानन रायकरांच्या 'मुंडकार' सारख्या कथेतून व्यवस्थेला व पिढ्यान पिढ्या होणाऱ्या अन्याय अत्याचाराला विरोध करणारे 'दसवंता' सारखे एखाद दुसरे पात्र येते. पण जुन्या पारंपारिक विचारांचा पगडा असलेल्या वडिलांच्या विचारामुळे आपल्या कुटुंबाला शोषणापासून, व्यवस्थेपासून परावर्तित करण्यापासून वंचित राहते. 'लवण', 'वादळ' या विठ्ठल गांवसांच्या कथेतूनही शेतकऱ्याचा, कुळांचा संघर्ष जाणवतो पण हा संघर्ष मध्यवर्ती कथेच्या तुलनेत विद्रोहाच्या पातळीवर येताना दिसत नाही. बऱ्याच प्रमाणात हा संघर्ष व्यवस्थेविरुद्धचा नसून व्यवस्थेतून बाहेर पाडण्याचा असल्याने विद्रोहाच्या पातळीवर पोहोचत नाही. ग्रामीण जीवन चित्रण हे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथाकारांच्या कथालेखनाचे एक वैशिष्ट्य ठरते पण संपूर्णपणे ग्रामीण कथाकार एकही कथाकारास म्हणणे रास्त वाटत नाही.

नव्वदोत्तरी कालखंडात सुरू झालेल्या जागतिकीकरणामुळे, नागरी जीवनव्यवस्थेत आलेली आधुनिकता, शहरांकडे ओढले जाणारे माणसांचे ताफे आणि त्यामुळे शहरी जगण्यातील वास्तवाचे चित्रण

नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती मराठी कथेमध्येही दिसू लागले. औद्योगिकीकरणामुळे शहरे निर्माण झाली आणि त्यामुळे गावातून माणूस शहरांकडे वळू लागला. समाजजीवनात झालेले हे बदल साहित्यातून व्यक्त होऊ लागले. भाऊ पाध्येंनी महानगरीय जीवनातील जगण्याचे वास्तव आपल्या लेखनातून मांडण्याचा प्रयत्न केला आणि त्याच्या पुढे जाऊन ही परंपरा जयंत पवारांसारख्या कथाकारांनी समर्थपणे पेललेली आपल्याला दिसून येते. १९८० नंतरच्या कालखंडात भाऊ पाध्येंनी आपल्या कथा लेखनातून महानगरीय जाणिवांचे भिन्न पैलू, मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीय महानगरीय समाजजीवनाबद्दलची संवेदना आपल्या कथेतून व्यक्त केली. जयंत पवारांच्या कथेविषयी लिहिताना रवींद्र पाथरे नोंदवतात, ‘‘गेल्या काही वर्षात महानगरीय संवेदनेच्या अंतरंगात शिरून त्याचा तळ ढवळणाऱ्या कथा लिहिणाऱ्यात जयंत पवार हे नाव आघाडीवर आहे. संवेदनशील नाटककार म्हणून त्यांची ओळख आहेच पण त्याचबरोबर त्यांनी महानगरीय कनिष्ठ मध्यमवर्गीय शोषितांचे विश्व साकारणाऱ्या कथा लिहिल्या.’’[6]

जयंत पवारांच्या कथेत आधुनिक काळात ढवळून निघालेली महानगरीय समाजव्यवस्था व जागतिकीकरणामुळे बदललेल्या परिस्थितीचे भान कथेतून व्यक्त झालेले आहे. ‘फिनिक्सच्या राखेतून उठला मोर’ व ‘वरण-भात लोन्चा कोन नाही कोनचा’ असे त्याचे दोन कथासंग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. मुंबईतील कनिष्ठ मध्यमवर्गीय प्रश्न तसेच गिरणी कामगारांचा संघर्ष त्यांच्या कथेतून व्यक्त होताना दिसतो. सतीश तांबे यांचे ‘राज्य राणीचं होतं’, ‘माझी लाडकी पुतना मावशी’, ‘रसातळाला ख.प.च.’, ‘मॉलमध्ये मंगोल’, ‘ना. मा. निराळे’, ‘मुक्काम पोस्ट सांस्कृतिक फट’ असे संग्रह प्रसिद्ध झाले. सर्वसामान्य माणसाला छळणारे, भेडसावणारे अनेक प्रश्न त्यांच्या कथेतून मांडलेले आहेत. मोठी शहरे, महानगरातील जीवनातील वेगामुळे होणारा बदल, मानवी मनाची घालमेल, अस्वस्थता, संघर्ष इत्यादीचे चित्रण त्यांची कथा करते. महानगरीय जीवनातील नीती कल्पना, चाळ संस्कृतीतील जीवनशैली, मूल्यव्यवस्था, सततची धावपळ, परात्मभाव, व्यसनासक्ती, विकृत कामगंडाने पछाडलेले माणसे, त्यांचे जीवनदर्शन त्यांची कथा करते. नव्या पिढीतले एक महत्त्वाचे कथाकार म्हणून पंकज कुरुलकर यांच्या कथेचा विचार करावा लागतो. ‘रेटसेज’, ‘डायरी’, ‘साकी बार अँड रेस्टॉरंट’, ‘तमसोमा’, ‘अनादी अनंत’, ‘अंधाराच्या दाही दिशा’, ‘चिरंतन दुःखाचे स्रोत’ असे त्यांचे संग्रह प्रसिद्ध झाले. बदलत्या काळाचे भावना व्यक्त करणाऱ्या या कथा आहेत. माणसाचे बदलते जीवनमान, बदलते प्रश्न, शहरी महानगरी जीवनातील व्यथा, अस्वस्थता, मानवी जीवनात येणारी वरवरची समृद्धी व दुसरीकडे समाजापासून तुटलेपणा, एकाकी अवस्था असे संदर्भ कुरुलकरांच्या कथेमध्ये आलेले आहेत. समर खडस यांचा ‘बकऱ्याची

बॉडी' हा कथासंग्रह महत्त्वाचा ठरतो. बदलत्या समाजजीवनात मानवी मनात निर्माण झालेली अस्वस्थता, असुरक्षितता, दहशत इत्यादीचे चित्रण विजय तांबे व समर खडस यांच्या कथांमध्ये दिसते. जी. के. ऐनापुरे यांचे 'खंगोल', 'सर्पसावल्या', 'कांदाचीर', 'स्कॉलर ज्यस', 'झिंझुरडा', 'निकटवर्तीय सूत्र' हे कथासंग्रह प्रसिद्ध झाले. १९८० – ९० नंतरच्या बदलत्या सामाजिक सांस्कृतिक वास्तवाचे चित्रण त्यांच्या कथेतून होते. महानगरीय सांस्कृतिक दर्शन घडवत, गिरणगावातील चाळींचा संघर्ष या कथांमधून व्यक्त होतो. मुंबईतल्या गिरण्यांचा संप आणि गिरण्या बंद होत लाखो कामगारांचे उद्ध्वस्त कुटुंब असे चित्रण ही कथा करते. त्याचबरोबर महानगरात मुंबईत होणारे बॉम्बस्फोट, दंगली इत्यादी संदर्भ त्यांच्या कथांमध्ये दिसून येतात. मुंबईतील महानगरीय जीवन वास्तवाचे चित्रण करत तिथल्या विविध स्तरावरील माणसाच्या जगण्यातील व्यथा वेदना गणेश मतकरी यांनी मांडण्याचा प्रयत्न केला. कुमार अनिल यांच्या 'पेशवाईत मेलेले १५ उंदीर' या कथासंग्रहातून महानगरातील बदलत्या समाज वास्तवाचा वेध घेतलेला दिसून येतो. विवेक मोहन राजापुरे यांना तीस वर्षाचे आयुष्य लाभले पण त्यांनी विविध नियतकालिकांमधून लेखन करत महानगरीय माणसाच्या अस्तित्वाची जाणीव त्यांच्या कथेतून प्रकट केली. नव्या पिढीतील एक तरुण लेखक म्हणून प्रणव सखदेव यांच्या कथेचा विचार करावा लागतो. दर्जेदार कथाकार म्हणून किरण केले यांचे नाव घ्यावे लागते. आधुनिक स्त्री-पुरुषातील नातेसंबंधावर भाष्य करणारा 'मोराची बायको' हा त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण असा कथासंग्रह ठरतो. मिलिंद बोकील, संजय भास्कर जोशी यांचे लेखनही महत्त्वाचे ठरते. नागरी जीवनाला केंद्रस्थानी ठेवत, शहरी, महानगरीय जीवनातील अस्वस्थता, दहशत, गिरण कामगारांचे संप, मोर्चे, ढासळलेली मूल्यव्यवस्था इत्यादी बदलत्या समाजजीवनातील गहन प्रश्न या कथाकारांच्या कथेतून येताना दिसतात.


आज मध्यवर्ती मराठी साहित्य वर्तुळात उमटणाऱ्या जागतिकीकरणाच्या तीव्र पडसादा संदर्भात डॉ. रवींद्र शोभणे लिहितात, " आता केवळ दलित (नकार-विद्रोह), केवळ ग्रामीण बदलत्या ग्रामसंस्कृतीचे चित्रण, वा केवळ स्त्रीवादी (स्त्रीमुक्ती व स्त्रीस्वातंत्र्य) या पातळयांवरच विचार करून चालणारे नाही; कारण आता आपले जीवन या जाणिवांना ओलांडून नव्या, मोठ्या वर्तुळात प्रवेश करू पाहते आहे याची जाणीव झाली तेव्हा कळत नकळत सामजिक वास्तव म्हणून हे सगळे ताण पुढे आले आणि आजच्या- समकाळातला कवी-लेखक त्या त्या जीवानुभवाशी झटू लागला. कविता, कथा, नाटक, कादंबरी या वाङ्मयप्रकारात हे जाणिवांच्या अनुभवांच्या पातळयांवरील बदल जाणवू लागले तेव्हा आपल्याला जाणवलं - आपण नव्या विश्वात वावरत आहोत. हे विश्व आपल्या आधीच्या पिढीपेक्षा अनेकार्थाने बदललेलं आहे. झपाट्याने बदलत आहे. मॉल्स संस्कृती, कॉम्प्युटर,

इंटरनेट, फेसबुक, पब्ज, मोबाईल, टी.व्ही. केबल्स, इंटरनेट कॅफे अशा अगदी नव्या संस्कृतीत आपण जणू फेकले गेलो. कादंबरीपुरते बोलायचे झाले तर या जाणिवांचा विचार रंगनाथ पठारे दुःखाचे श्वापद पासून करायला लागलेले दिसून येतात. 'त्रिधा', 'कुंठेचा लोलक' किंवा अलीकडची 'भर चौकातील अरण्यरुदन' या कादंबऱ्या वाचताना हे जाणवू लागते. प्रशांत दळवीचे 'चाहूल', किरण पोत्रेकरचे 'कळा ज्या लागल्या जीवा' किंवा रसिका जोशीचे 'व्हाइट लिली आणि नाईट रायडर' या नाटकांच्या निमित्ताने हे तपासून पाहता येईल. कथा आणि कवितेच्या संदर्भातही अनेक नावे घेता येतील. सतीश तांबे, जयंत पवार, आसाराम लोमटे, प्रज्ञा दया पवार, (कथा) तर कवितेच्या बाबतीत आजची बहुतेक नावे या संदर्भात विचारात घ्यावी लागलीत. आजच्या समाजवास्तवाचा विचार करताना या पिढीच्या लेखकाला जागतिकीकरणाच्या या अटळ वास्तवाला सामोरे जाण्याशिवाय दुसरा पर्याय उरत नाही, हेही तेवढेच खरे आहे." [7] मध्यवर्ती कथेमधील हे तीव्र स्वरूपाचे बदल गोमंतकीय कथेमध्ये दिसून येत नाही.

खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद मध्यवर्ती मराठी कथेच्या तुलनेत अत्यंत पुसट प्रमाणात नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत उमटले आहे असे म्हणावे लागते. यात प्रामुख्याने जागतिकीकरणामुळे शहरीकरणाच्या प्रक्रियेत असलेल्या गोमंतकाचे चित्र दिसून येते. खाण व्यवसाय व अमर्यादित आयात निर्यातीमुळे, अतिप्रमाणात होणारे खनिजाचे उत्खनन, त्यामुळे संपुष्टात येणारे गोमंतकीय सामाजिक, सांस्कृतिक जीवन तसेच होणारा पर्यावरणाचा ऱ्हास, पर्यटनामुळे, कॅसिनोंमुळे संपुष्टात येणारी ग्रामसंस्कृती, पर्यटनामुळे होणारा मूल्यऱ्हास, जागतिकीकरणामुळे फोफावलेला चंगळवाद, सांस्कृतिक एकजिनसीकरणामुळे मूळ संस्कृतीला बसलेले हादरे, गोवा सोडून बक्कळ पैसा कमाविण्यासाठी परदेशात गेलेल्या गोवेकरांचे कौटुंबिक प्रश्न, उदारीकरण व खाजगीकरणामुळे आलेल्या फॅक्टरी, कारखाने व त्यामुळे बळकावलेल्या शेतीजामिनी इत्यादी खा-उ-जा संस्कृतीशी निगडीत प्रश्नांचे चित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत येते.

ज्ञानेश्वर कोलवेकर, विठ्ठल गांवस, मिलिंद म्हामल, दयाराम पाडलोस्कर, गजानन देसाई या कथाकारांच्या कथालेखानातून निर्माण झालेले खा-उ-जा संस्कृतीशी निगडीत अनुभवविश्व मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेच्या तुलनेत काही मोज्यक्याच विषयांपुरते सीमित झाल्याचे आपल्याला दिसून येते. याची भौगोलिक व सामाजिक कारणेही आहेत. महाराष्ट्र हे क्षेत्रफळाच्या दृष्टीने खूप मोठे राज्य आहे. महाराष्ट्रातील मुंबई या एका महानगराचाच विचार केल्यास, मुंबई हे महानगर ६,३२८ चौरस किलोमीटर आहे व गोवा हे राज्यच ३,७०२ चौरस किलोमीटर

आहे. मध्यवर्ती नव्वदोत्तरी मराठी कथेतील बहुतांशी लेखन हे महानगरीय जाणिवा केंद्रस्थानी ठेवत लिहिल्याने अनुभवांची व्यापकता आपल्याला दिसून येते. गोवा हे राज्य शहरीकरणाच्या प्रक्रियेत आहे, राज्य यंत्रणेचा अर्थव्यवस्थेला बळकटी देण्याच्या प्रयत्नात असलेल्या गोव्याचे प्रश्न वेगळे आहेत. कॅसिनो, पर्यटन या गोष्टींमुळे समाजजीवनात अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत, त्यामुळे अनुभवांची पृथगात्मकता गोमंतकीय मराठी कथा व मध्यवर्ती मराठी कथेत जाणवते. खा-उ-जा संस्कृती हा नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेचा व नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेचा एक स्थायी भाव असला तरी मध्यवर्ती मराठी कथेच्या प्रभावाने हे पडसाद गोमंतकीय कथेवर उमटल्याचे म्हणता येत नाही. दोन्ही कथेतून उमटणारे जीवनानुभव स्वतंत्र व स्वयंभू आहेत व त्या त्या प्रांतातील समाजजीवनातील बदलांनुसार आकार घेत असल्याचे म्हणावे लागते. (पुढील आकृती पहा.)




**6.4 मध्यवर्ती व गोमंतकीय नव्वदोत्तरी स्त्री कथालेखन: प्रभाव व भेद**

नव्वदोत्तरी स्त्री लिखित कथालेखनात भिन्न पातळीवरील स्त्री जीवनविषयक अनुभवांची मांडणी झालेली दिसून येते. मराठवाड्यातील ग्रामीण राजकारण व त्यामुळे विस्कटलेली गावे याचे प्रत्ययकारी चित्रण

मथु सावंत आपल्या कथेतून करतात. पुरुषी वर्चस्वामुळे ग्रामीण भागातील स्त्रीची होणारी पिळवणूक त्यांची कथा रेखाटते. ग्राम जीवनातील भिन्न संदर्भ स्त्री लेखिकांनी उलगडण्याचा प्रयत्न केलेला आहे त्यात प्रतिमा इंगोले या महत्त्वाच्या लेखिका ठरतात. स्त्री जीवनाचे विविध पैलू, तिच्या भावभावनांचे मनोविश्व उत्तम पद्धतीने प्रतिमा इंगोले यांनी साकारलेले आहे. स्त्रीच्या समस्या, भिन्न स्तरांवर होणारी तिची कुचंबणा, मानसिक शोषण ही कथा करते. एकंदरीत ग्रामीण स्त्री दुःखाचा वेध घेणाऱ्या प्रतिमा इंगोले यांच्या कथा आहे. त्याचबरोबर मूल्यांचा ऱ्हास, राजकारण, शेती व्यवसायाशी निगडित आर्थिक प्रश्न इत्यादी विषय त्यांच्या कथेमध्ये आलेले दिसून येतात. मथु सावंत, प्रतिमा इंगोले, ललिता गादगे, अनुराधा गुरव, कुमुद मंडलेकर, सरोज शिंपाळे त्याचबरोबर काही प्रमाणात अनुराधा वैद्य, उर्मिला पवार यांनीही ग्राम जीवनाच्या पार्श्वभूमीवर लेखन केलेले दिसून येते. या ग्रामीण लेखिकांच्या कथेत कृषिधिष्ठित ग्रामीण जीवन चित्रणाबरोबर ग्रामीण पुरुषांचे तटस्थपणे वास्तवदर्शी दर्शन आपल्या कथांमधून केलेले आहे. ग्रामीण स्त्रीचे परावलंबित्व, दुःख इत्यादींचे चित्रण केलेले आहे. स्त्रीचे भावजीवन चित्रित करत असताना ग्रामीण पार्श्वभूमीचा आधार घेत लोकजीवन व लोकसंस्कृतीच्या माध्यमातून खेडूतांच्या भावना व लोकमानसावर प्रकाश टाकलेला आहे. गोमंतकीय लेखकांच्या कथेमध्ये ग्रामीण स्त्री जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न दिसतो, पण गोमंतकीय एकही लेखिकेकडून ग्रामीण जीवनाच्या पार्श्वभूमीवर कथा लिहित ग्रामीण स्त्री जीवन चित्रण झालेले दिसून येत नाही.

'१९९० नंतरचे स्त्रीवादी मराठी कथाविश्व' या लेखात एकनाथ ढोणे लिहितात, "काळाबरोबर समाज बदलतो, समाजाबरोबर समस्या बदलतात, परिस्थिती बदलते. त्यामुळे १९६० चा 'स्त्रीवाद' आणि १९९० नंतरचा 'स्त्रीवाद' यात फरक पडलेला दिसून येतो. सामाजिक, आर्थिक, राजकीय, कौटुंबिक, नैतिक बदल झाल्याचे दिसून येते. १९६० च्या कथेतील सर्वच पुरूषांना आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाते. परंतु काळानुरूप मानवी वर्तनात बदल होऊन वरील वृत्तीने परीवर्तन होत आहे. या परीवर्तनीय वृत्तीचे चित्रण नव्वदोत्तरी स्त्रीवादी कथेत सामाजिक, सांस्कृतिक, वाङ्मयीन परंपरेचा प्रभाव आहे. त्यामुळे १९९० नंतरची स्त्री, स्त्रीवादीकथेत स्त्रियांच्या संदर्भात येणाऱ्या समस्या, सुख- दुःख या सर्वच विषयावर मुक्तपणे संवाद साधणारी दिसते म्हणून नव्वदोत्तरी 'स्त्रीवादी साहित्य' स्त्रीसंवादी आहे असे मला वाटते."[४] १९९० नंतरच्या काळात प्रभावीपणे लेखन करणाऱ्या सानिया, गौरी देशपांडे, प्रिया तेंडुलकर, मेघना पेठे, आशा बगे या कथालेखिकांचा विचार करावा लागतो. उदा. गौरी देशपांडेंच्या कथेतील नायिका या प्रामुख्याने व्यक्तिस्वातंत्र्याचा अंगीकार करणाऱ्या दिसून येतात. कथेच्या आरंभी काळापासून अन्याय, अत्याचार या परिस्थितीविरुद्ध संघर्ष करणारी स्त्री दिसून आलेली

आहे. जीवनाला तडा देत आपल्या आयुष्याचे निर्णय स्वत: घेणारी स्वतंत्र स्त्री गौरी देशपांडे यांच्या कथेमधून आली. मेघना पेठे आपल्या कथेत मानवी नातेसंबंधाबद्दल भाष्य करतात, त्यांच्या कथेतील स्त्री – पुरुष पात्रे ही आर्थिक स्वातंत्र्य, वैचारिक स्वातंत्र्याला महत्त्व देणारी दिसून येतात. आधुनिक काळात वावरताना स्त्रीत्वाच्या रूढ कल्पनांना नाकारत पुरुषप्रधान व्यवस्थेला नकार देणारी ही लेखिका ठरते. नव्वदोत्तरी स्त्रियांच्या कथालेखानातून व्यापक स्वरूपाचे जीवनविश्व उभे राहिले. मोनिका गजेंद्रगडकरांची आधुनिक काळातील नातेसंबंध, नातेसंबंधातील गुंत्यावर भाष्य करणारी कथा आहे. नीरजा, प्रज्ञा दया पवार, मनस्विनी लता रवींद्र, शिल्पा कांबळे या लेखिकांच्या लेखनातून महानगरीय जीवन वास्तव व्यक्त होताना दिसून येते. प्रतिमा जोशी यांचे कथालेखनातून महानगरातील वेश्या वस्तीतील स्त्रियांचे वेदनादायी जीवन मांडण्याचा प्रयत्न होताना दिसतो. प्रज्ञा दया पवार यांनी 'अफवा खरी ठरावी' हा संग्रह लिहिला. जागतिकीकरणाच्या युगातही माणसाच्या मनात जातीयतेची मुळे घट्ट धरून राहतात याचे चित्रण त्यांच्या कथेने केले. तसेच आजच्या इंटरनेटच्या युगात माणसाची बदलते नीतिमूल्ये आणि निर्माण होणाऱ्या समस्या त्यांच्या कथेतून दिसून आल्या. मनस्विनी लता रवींद्र यांनी मानवी नातेसंबंधातील विदीर्णता, माणसाचे एकटेपणा त्याचे चित्रण केले आहे. सुकन्या आगाशे यांचे 'न लिहिलेली पाने', 'इस्पितळ आणि पतंग उडवणारा माणूस' हे कथासंग्रह महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या कथेत महानगरीय जीवनातील यांत्रिकता, माणसांमध्ये हरवत चाललेले संवेदनशीलता इत्यादीचे चित्रण होताना दिसते. प्रतिमा जोशी यांचे 'जहन्नम' आणि 'दण्डकारण्य' हे संग्रह प्रसिद्ध झाले. त्यांच्या कथेमधून 'रेड लाईट एरिया' म्हणजेच वेश्या वस्तीतील दु:ख, यातना, पुरुषी वासनेला बळी पडलेल्या, स्त्रियांचे भावविश्व मांडताना सामान्य कष्टकरी स्त्रियांपासून देहविक्रीच्या व्यवसायात अडकलेल्या स्त्रियांच्या वेदना मांडलेल्या आहेत तसेच आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, जातीय स्तरावरची मानवी संघर्षाची अनेक रूपे त्यांच्या कथाविश्वात आलेली आहेत.

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा लेखिकांवर असलेल्या मध्यवर्ती कथेच्या प्रभावाचा विचार केल्यास. माधवी देसाई व हेमा नाईक यांच्या कथांमध्ये स्त्री वादाची छटा आपल्याला दिसून येते. उर्वरित बहुतांशी कथा लेखिका या प्रामुख्याने मध्यमवर्गीय कौटुंबिक स्त्री जीवनाचे चित्रण करत, स्त्री जीवनाच्या शोकांतिका, स्त्री स्वभावाच्या भिन्न छटा, आधुनिक स्त्री जीवन, स्त्रीचे प्रश्न, स्त्रीमधील तटस्थपणा, आधुनिक नातेसंबंध इत्यादींपुरते मर्यादित अनुभवविश्वास आकार देताना दिसून येतात.

## 6.5 तंत्रनिष्ठ प्रभाव आणि भेद

नव्वदोत्तरी कथेत आशयत्मकदृष्ट्या साम्य - भेद दिसून येतो. त्याचप्रमाणे कथा लेखनाच्या तंत्राच्या अनुषंगानेही विचार करणे गरजेचे ठरते. नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेतील महत्त्वाचे नाव विचारात घेताना आनंद यादवांच्या ग्रामीण कथेचा विचार करणे गरजेचे ठरते. “आनंद यादवांनी मराठी ग्रामीण कथेला एक नवे वळण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यामूळेच त्यांच्या समकालीन आणि त्यानंतरच्या ग्रामीण कथाकारांनी आनंद यादवांच्या कथेप्रमाणे आपली कथा निर्माण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.” [9] असे मत मीना कदम यांनी आपल्या नव्वदोत्तरी ग्रामीण कथेच्या प्रबंधलेखनातून मांडलेले दिसून येते. आनंद यादवांच्या कथेतील वैशिष्ट्यपूर्णतेबद्दल व तंत्रदृष्ट्या साधलेल्या विकासाबद्दल रवींद्र ठाकूर लिहितात, “शंकर पाटलांच्या कथेत ग्रामीण माणसाच्या मनाविषयी लेखक बोलत होता, तर यादवांच्या कथेत स्वतः ग्रामीण माणूसच बोलू लागला. शंकर पाटील क्वचित पात्रांच्या व्यक्तित्वाशी समरस होऊन प्रथमपुरूषी निवेदन पद्धतीने त्यांच्या भावभावना शब्दरूप करीत होते. परंतु, यादवांनी पात्रांनाच बोलायला लावले. येथे लेखकाची भाषा आणि पात्रांची भाषा असा वेगळेपणा उरलाच नाही. वर्णनाचा पसारा टाळून आशयानुकूल तेवढीच वर्णने करण्याची पद्धत अवलंबिली गेली. त्यामुळे यादवांची कथा अधिक लघू झाली. ग्रामीण कथेला यादवांनी असे वेगळे वळण दिले.” [10] वास्तव जीवन चित्रित करत असताना यादवांच्या ग्रामीण कथेच्या प्रयोगशील शैलीमुळे त्यांची कथा वास्तव जीवन चित्रित करतानाच चिंतनशीलही बनू लागली. म. द. हातकणंगलेकर या संदर्भात म्हणतात, “दुःखाची मूळ आर्तता, ते भोगत असतानाच त्यांच्या चिंतनात वृत्ती बुडवून टाकल्यामुळे या आर्ततेला प्राप्त होणारे नादमय सौंदर्य, याबरोबरच भाषेच्या प्रतिमांच्या सुप्त लावण्यमयतेचा चाललेला शोध यामुळे यादव ग्रामीण कथेला आविष्काराचे एक अभिनव परिमाण देऊन या कथेचे एक नवे घराणे निर्माण करीत आहेत, असे लोभस दृश्य काही काळ दिसले.”[11] गोमंतकीय कथेतील अनुभवविश्व हे लघु रूपातून आकार घेताना दिसून येते. ग्रामजीवनातील वास्तव चित्र हे अनुभवकथनात्मक पद्धतीने प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीने तसेच ग्रामजीवनातील व्यक्तींच्या कहाण्या तृतीयपुरुषी निवेदन पद्धतीचा अवलंब करून रचलेल्या दिसून येतात. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत वास्तव चित्रणाबरोबर अनुभव कथन अत्यंत सोप्या पद्धतीने रूढ सुरूवात, मध्य अंत या कथा साच्यात वावरताना दिसते.

भास्कर चंदनशिव सारख्या कथालेखकाचा विचार करणे गरजेचे ठरते. मानवी मनाचा वेध घेत आजच्या काळातील माणूस उलगडण्याचा प्रयत्न त्यांची कथा करते. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेत ग्रामजीवनातील भिन्न मानवी मनांचा वेध घेण्याचा, आजचा माणूस उलगडण्याचा प्रयत्न बऱ्याच प्रमाणात विठ्ठल गांवस यांच्या कथा लेखनातून झालेला दिसून येतो. भास्कर चंदनशिव यांच्या कथेविषयी मीना कदम लिहितात, "विशिष्ट विचारधारा आणि प्रतिमांची सहजसुंदर भाषा त्यांच्या कथेची वैशिष्ट्ये सांगता येतील. ग्रामीण परिसर, निसर्ग, तेथील संस्कृती यांचा सुंदर मिलाफ त्यांनी आपल्या कथेत घडवून आणलेला आहे."[12] विठ्ठल गांवसांच्या कथेतील ग्रामीण विश्वही निसर्ग, वातावरण, सांस्कृतिक जीवनाच्या मिलापातन साकारलेले दिसून येते.

मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेतून प्रतिमांची भाषा आकारताना दिसते. भास्कर चंदनशिव, नागनाथ कोत्तापल्ले यांच्या ग्रामीण कथेतील प्रतिमासृष्टी म्हणा किंवा आताच्या पिढीतील तरुण लेखकांमधील 'मोराची बायको' सारख्या कथासंग्रहातून किरण येले यांसारखे कथाकार प्रतिमासृष्टीतून कथेचे आशयविश्व साकारताना दिसून येतात. प्रतिमा निर्मितीतून आशयाचे भिन्न कंगोरे उलगडणे हे नव्वदोत्तरी कथाविश्वाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. मध्यवर्ती मराठी कथाविश्वातील प्रयोगशीलातेचे ते लक्षण आहे. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेमधून प्रतिमासृष्टीच्या आधारे आशयविश्वाचा डोलारा उभारत प्रयोगशील अशी कथा आलेली दिसून येत नाही. एखाद दुसरी दयाराम पाडलोस्करांच्या लिखाणात आलेल्या 'चोपडी' सारख्या कथेचा इथे विचार करावा लागेल.

मध्यवर्ती नव्वदोत्तरी मराठी कथेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या कथेला लाभलेले दीर्घ स्वरूप. एकीकडे कथा हा साहित्यप्रकार फुटकळ व दुय्यम मनाला गेला असता समकालीन कथा दीर्घत्वाकडे जात, अत्यंत ताकदीने आशय व अनुभवविश्वाचे आविष्करण करताना दिसते. नव्वदोत्तरी ग्रामीण कथाकारांमधले महत्त्वाचे कथाकार आसाराम लोमटे यांच्या कथेविषयी रंगनाथ पठारे लिहितात, "आसाराम लोमटे यांच्या कथा या आजच्या उद्ध्वस्त होत चाललेल्या ग्रामसमाजातील कोसळणीच्या कथा आहेत. त्यांच्या कथांतील दु:खाच्या स्फोटाचे स्वर आपलं अंत:करण घुसळून टाकतात. या दु:खांच्या मिती, रीती आणि त्यांची घनता यांचं जडत्व आपल्याला खिळवून बांधून टाकतं. मानवी समूहांचं खचून जाणं, उखडलं जाणं या खेडयांमधल्या आजच्या भीषण वास्तवाचं अत्यंत भेदक चित्र लोमटे यांच्या कथांमधून उभं राहतं. या कथांचा दीर्घत्वानं, त्यांच्या समूहकेंद्री असण्यानं त्यात भरच पडते. आपल्या भावनिक जडत्वावर प्रहर करणाऱ्या या स्वास्थ्यहारक कथा

म्हणूनच फार महत्वाच्या आहेत."[13] दीर्घत्वाबरोबरच निवेदनातही अनेक प्रयोग मध्यवर्ती नव्वदोत्तरी कथेमध्ये होताना दिसतात. उदा. मोनिका गजेंद्रगडकर यांच्या कथेतील निवेदनशैलीत अत्यंत कलात्मकता दिसून येते. प्रथमपुरुष व तृतीयपुरुष निवेदनपद्धतींचा वापर करत व्यक्ती स्वभाव व मानसिक अवस्थांतरांचे चित्रण त्यांच्या कथेतून येते. उदा. "कमी बुद्धीमुळे तो आयुष्यात फार काही विशेष नाही करू शकला, पण त्याचं एक सुदैव असं की त्याला माझ्या आजीसारखी आई मिळाली, आजी एकदम शहाणी, व्यवहारी, जिद्दीची नि महत्त्वाकांक्षीही तितकीच. तिने एका ईर्षेनेच झपाटल्यासारखं माझ्या बाबाला शिकवत नेलं. रेटत रेटत ग्रॅज्युएट करून महाडच्या महानगरपालिकेत ओळखीने चिकटवलं. नऊ ते पाच या वेळात माझा बाबा तिथे त्याच्या मर्यादेतलं खर्डेघाशीचं काम करत राहिला आहे. सरकारी काम, तसा जेमतेम पगार... पण का होईना, आज स्वाभिमानाने माझा बाबा स्वतःच्या पायांवर तर उभा आहे! यामागचं खरं कर्तृत्व आजीचंच की !" [14] 'बाबाची आई' या कथेतील प्रथमपुरुषी निवेदन पद्धतीचा स्वीकार करत निवेदन करणारी कथेतील वडिलांची मुलगी असलेली 'ती' निवेदनातून आजी व वडील या पात्रांच्या माध्यमातून त्याच्या भाव - स्वभावाचे, मानसिकतेचे चित्रण अत्यंत ओघवत्या पद्धतीने करताना दिसतात. निसर्ग वर्णनातून मानवी अंतरंगात शिरून भाववृतीचा वेध घेण्याचा प्रयत्नही गजेंद्रगडकरांच्या 'सारांश' या कथेतील निवेदनातून दिसतो. उदा. "कठड्याचा आधार घेत ललिता डेकच्या पायऱ्यांवर बसली. आरती आणि आपल्या इथेच गप्पा रंगायच्या. सोबतीला आरतीची आवडती कॉफी असायची. स्प्रिंगमध्ये आलो तर मॅग्नोलिया असाच मोहरलेला दिसायचा. दोन वर्षांपूर्वी आलो होतो तेव्हा आरतीच्या पडझडीला सुरूवात झाली होती. अबोल, खिन्न वाटत होती ती त्या भेटीत. तिच्या व्यक्तिमत्त्वातलं चैतन्य हरवत चाललं होतं. आपल्या पुढच्या पायरीवर ती बसलेली. मान आपल्या मांडीवर टेकवलेली. त्या वर्षी मॅग्नोलियाही उदास वाटत होता जसा. नव्हता तोही बहरलेला. त्याच्याकडेच नजर होती आरतीची. आपण विचारलं होतं तिला तर म्हणाली, 'मेनॉपॉजचा त्रास सुरू झालाय. खूप उदास वाटतं अलीकडे आई. कारण नसताना मी एकटीच रडत राहते. मी तुटत चालले आहे सगळ्यापासून वाटतं...'[15] सदैव बहरणारे मॅग्नोलियाचे झाड कथेतील आरती या पात्र पडझडीवेळी बहरलेले नव्हते. अशा पद्धतीने वर्णनात्मकतेचा एक प्रयोग लेखिका करतात. गोमंतकीय कथेच्या निवेदन तंत्राचा विचार केल्यास ते तृतीय पुरुषी व प्रथम पुरुषी असल्याचे जाणवते. व्यक्तिचित्रण, पात्रांच्या मानसिकतेचे चित्रण करत असताना प्रयोगशीलता दिसून येत नाही तर रूढ निवेदनाच्या पद्धतीप्रमाणेच कथानकाचा एक भाग बनत व्यक्ती, मानसिकता इत्यादींचे चित्रण होताना दिसून येते.

### 6.6 गोमंतकीय मराठी कथेची वैशिष्ट्ये बलस्थाने: मध्यवर्ती कथेच्या तुलनेत

गोमंतकीय मराठी कथेने आपले वैशिष्ट्यपूर्ण असे स्थान मराठी कथेत निश्चित केलेले आहे. कथा या वाङ्मयप्रकारचा वाङ्मयीन प्रवास सुनिश्चित करण्यास गोमंतकीय मराठी कथेचे महत्त्वाचे योगदान आहे. कृष्णदास शामा यांच्या श्रीकृष्णचरित्रकथा या आद्य काव्य ग्रंथातून सांगितलेली कथा, कथेच्या आरंभ काळात १९१० च्या दरम्यान भिन्न नियतकालिकांमधून झालेले स्त्रियांचे कथा लेखन, १९३० दरम्यान मराठी कथाविश्वात प्रादेशिकतेची संकल्पना गोमंतकीय कथेतून मांडणारे वि. स. सुखटणकर, नवकथेच्याही आधी मनोविश्लेषणात्मक स्वरूपाचे लेखन करणारे लक्ष्मणराव सरदेसाई, विपुल प्रमाणात कथालेखन करत कौटुंबिक स्वरूपाचे लेखन करत आपले कथाविश्वात आपले स्थान निर्माण करणारे पंडित महादेवशास्त्री जोशी असे समर्थ कथाकार गोमंतकाने मराठी साहित्यक्षेत्राला दिलेले आहेत. गोमंतकीय कथेची स्वतंत्र अशी बलस्थाने आहेत जी गोमंतकीय कथेला गोमंतकीयत्व बहाल करतात.

गजानन रायकर यांच्या 'नातालीन' या कथासंग्रहाला मराठीतील एक महत्त्वाचे कथाकार रंगनाथ पठारे यांची प्रस्तावना लाभलेली आहे. गोमंतकीय मराठी कथेत आलेल्या कोंकणीतील वैशिष्ट्यपूर्ण संवादांमुळे गोमंतकीय कथेला वेगळेपणा व भाषिकदृष्ट्या समृद्ध करते. गजानन रायकर यांच्या कथेतील कोंकणी शब्दांच्या वैशिष्ट्यपूर्णतेला अनुसरून लेखक म्हणतात, "मराठीनं सांडलेलं कैक संचित कोंकणीनं जपलेलं आहे. कोंकणीच्या पर्यावरणात जगून मराठी लिहिणाऱ्यांनी मराठीला सुंदर केलंय." पुढे ते लिहितात, "काही पोर्तुगीज संस्कारांचे, बरेच कोंकणाच्या मातीतले शब्द या निमित्ताने मराठीतं आले, त्यांनी आपल्या भाषेला पुष्ट केलं आणि आपल्याला गोव्याच्या मातीशी, तिथल्या माणसांची, निसर्गाशी जोडलं, यापेक्षा आणखी आपल्याला काय पाहिजे? वरवरच्या निसर्गसुंदर गोव्यापेक्षा अधिक आत या कथा आपल्याला नेतात, तिथल्या कष्टकऱ्यांच्या सुख दु:खांशी आपल्याला जोडतात. निसर्गसौंदर्य या सकटच असतं याचं भान देतात. हे फार महत्त्वाचं."[16] गोव्यातील समाजजीवनाचा आलेख कथेतून मांडताना कोंकणी भाषेतील संवादाचा वापर नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेतून होताना दिसतो. गोवा हे छोटे राज्य असले तरी उत्तरेतील पेडणे ते दक्षिणेतील काणकोणपर्यंत कोंकणीच्या भिन्न बोलींचा वापर होतो. नव्वदोत्तरी कथाकारांच्या कथांमध्ये कोंकणीच्या भिन्न लकबी संवादातून येतात. कोंकणी भाषेतील अनेक वैशिष्ट्यपूर्ण शब्दांचा वापर या कथेत जाणवतो. त्याचप्रमाणे निवेदनातून सहजपणे काही कोंकणी भाषेतील स्थानिक शब्द अकृत्रिमरित्या व सहजपणे लेखनातून आलेले

दिसून येतात. त्यामुळे नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेचे भाषिक सौंदर्य हे या कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. गोमंतकातील कोंकणी भाषेच्या आधारे व्यक्त होणाऱ्या प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या अनुभवविश्वास अस्सलपणाही लाभतो.

गोमंतकीय मराठी कथेतून दिसून येणारी जीवनसन्मुखता हे या कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागते. नव्वदोत्तरी कालखंडातील गोव्यातील ग्रामजीवनातील बदलांचे चित्रण या कथेत येते त्याचबरोबर विकसनशील अशा गोव्यावर उमटलेल्या खा-उ-जा संस्कृतीचे पडसादही या कथेतून व्यक्त होतात. जीवनातील भिन्न अनुभवांशी बांधील असलेली ही कथा 'गोवा' हा प्रदेश केंद्रस्थानी ठेवून लिहिली गेली असल्याकरणामुळे हा प्रदेश व इथले प्रश्न वाचकांसमोर उलगडतात. इथल्या प्रदेशाबरोबर आकार घेणाऱ्या भिन्न मानवी वृत्ती प्रवृत्तींचे चित्रण कथेतून होते. कथेच्या निवेदनातील सहजपणा, सोपी व ओघवती कथालेखन शैली हे या कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागते.

गोव्याची एक दूषित प्रतिमा जगभर निर्माण होत असताना येतील सांस्कृतिक संचित, इथल्या परंपरा, चालिरीती दुर्लक्षिल्या जातात. गोवा म्हणजे फक्त मद्य, कॅसिनो ही प्रतिमा निर्माण होत असताना, नव्वदोत्तरी कथेतून ही गोव्याची ओळख नसून हे आजच्या गोव्याचे प्रश्न असल्याचे वाचकांना समजते. गोव्याची खरी ओळख हे इथल्या संस्कृतीत, परंपरेत दडलेली असल्याचा प्रत्यय कथा वाचनातून येतो. नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेत गोव्याचे सांगोपांग चित्रण होत असताना इथल्या भिन्न रूढी, परंपरा वर्णनात्मक पद्धतीने वाचकांपुढ्यात येताना दिसतात. त्यामुळे गोव्याची भाषा, इथल्या भिन्न बोली, कथेची ओघवती, साधी सोपी शैली, गोव्यातील रूढी परंपरा, इथल्या प्रदेशनिष्ठ स्वरूपाच्या प्रश्नांची मांडणी ही निश्चितच गोमंतकीय मराठी कथेची बलस्थाने म्हणावी लागतील.

### 6.7 समारोप

नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेवर उमटलेला मध्यवर्ती मराठी कथेचा प्रभाव विचारात घेत असताना लक्षात येते की साठोत्तरी साहित्यविश्वात निर्माण झालेल्या ग्रामीण साहित्याचा प्रभाव गोमंतकीय कथेवरही उमटलेला आहे. ग्रामजीवनातील बदलांचे, ग्रामजीवनातील प्रश्नांचे चित्रण मध्यवर्ती नव्वदोत्तरी ग्रामीण कथेत होताना दिसते त्याचप्रमाणे गोमंतकीय ग्रामजीवनातील प्रश्नांचे चित्रण येते. पण ग्रामीण जाणिवा, ग्रामीण प्रश्न, ग्रामीण संस्कृती यांमध्ये दोन्ही भागात भिन्नता असल्यामुळे अनुभवविश्वात फरक जाणवतो. ग्रामीण प्रवाह एक असला तरी भिन्न

जाणिवा व ग्रामसंस्कृतीत झालेल्या बदलांचे चित्रण इत्यादी गोष्टी समांतर जाताना दिसत नाही. नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथेतून दिसून येणाऱ्या ग्रामजीवनातील वास्तवाचे व संघर्षाचे चित्रण हे नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेच्या तुलनेत तीव्र स्वरूपाचे जाणवते. खाजगीकरण, उदरीकरण व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत निर्माण झालेल्या बदलांचे चित्रण नव्वदोत्तरी मध्यवर्ती कथेत व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथेतही आहेत परंतु दोन्ही वर्तुळातील समाजजीवनावर उमटलेले खा-उ-जा संस्कृतीचे पडसाद हे भिन्न पातळीवर चालताना दिसून येतात. दोन्ही वर्तुळातील सामाजिक प्रश्नांमध्ये भेद असल्याचे आपल्याला दिसून येते. एकूण नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती मराठी कथा व गोमंतकीय मराठी कथा या दोहोंमधील खा-उ-जा संस्कृतीमुळे व्यक्त झालेल्या अनुभवविश्वाचा आशय विषयाचा अंतस्वरच पूर्णतः भिन्न जाणवतो. त्यामुळे नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती मराठी कथा व गोमंतकीय मराठी कथा या समांतर जात नाहीत तर प्रदेशानुरूप मानवी जीवनाच्या अनुभवकक्षेला आकार देताना दिसतात.

नव्वदोत्तरी मध्यवर्ती स्त्री कथालेखन व गोमंतकीय स्त्री कथालेखनातही बराच भेद जाणवतो. नव्वदोत्तरी कालखंडातील मध्यवर्ती स्त्री कथा लेखनातील अनुभवविश्व हे विविधांगी असल्याचे जाणवते तर नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखिकांचे अनुभवविश्व हे प्रामुख्याने स्त्री जीवनापुरते मर्यादित चित्रित झाल्याचे दिसून येते. ग्रामीण स्त्री जीवनचित्रण नव्वदोत्तरी गोमंतकीय लेखिकांच्या कथांतून दिसत नाही. नव्वदोत्तरी कथेचा स्थायीभाव हा ग्रामीण किंवा सद्यकालीन खा-उ-जा संस्कृती व बदल हा असला तरी नव्वदोत्तरी मध्यवर्ती मराठी कथा व नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा समांतर जाते असे म्हणणे अयोग्य ठरते. मध्यवर्ती कथेने नव्वदोत्तरी कालखंडात स्वीकारलेली प्रयोगशीलता, कथेला लाभलेले दीर्घ स्वरूप, या निकषांवर दोन्ही कथा समांतर जात नाहीत. नव्वदोत्तरी गोमंतकीय मराठी कथेवर प्रामुख्याने पूर्वसुरींच्या गोमंतकीय कथाकारांच्या कथातंत्रांचाच पगडा दिसतो. स्वतःच्या अनुभवाच्या व तंत्राच्या कक्षेत वावरणारी नव्वदोत्तरी गोमंतकीय कथा ही मध्यवर्ती मराठी कथेला समांतर न जाता स्वतःच्या वर्तुळात वावरताना दिसून येते.

**संदर्भ**

[1] कानडजे, एस. एम्. *पीळ आणि पैलू (रा रं बोराडे यांच्या साहित्याचा अभ्यास)*. प्रतिभास प्रकाशन, परभणी. प्रथमावृत्ती २००४. पृ. क्र. १३४.

[2] ठाकूर, रवींद्र. *साहित्यिक आनंद यादव*. बळीवंश प्रकाशन, नांदेड. प्रथमावृत्ती २०११. पृ. क्र. २३.

[3] कदम, जगदीश. "मराठवाड्यातील साहित्य". *मराठवाड्यातील कथावाङ्मय*. लुलेकर, प्रल्हाद जी., सतीश बडवे (संपा.). कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद. प्रथमावृत्ती २००७. पृ. क्र. १२३.

[4] सुरवडे, मनोहर. *१९८० नंतरची ग्रामीण कथा*. बळीवंश प्रकाशन, नांदेड. प्रथमावृत्ती २०१०. पृ. क्र. २४६.

[5] कदम, मीना. *नव्वदीनंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तनवादी विचार: एक अभ्यास*.(प्रबंध) जानेवारी २०१८. पृ. क्र. ५३.

[6] पाथरे, रवींद्र. "महानगरीय वास्तवाचा उभा-आडवा छेद"(लेख). रविवार पुरवणी दै. *लोकसत्ता*, दि. २२.०७.२०१८.

[7] शोभणे, रवींद्र. *जागतिकीकरण समाज आणि मराठी साहित्य*, विजय प्रकाशन, नागपूर. २०११. पृ. क्र. १५.

[8] ढोणे, एकनाथ. "१९९० नंतरचे स्त्रीवादी मराठी कथाविश्व". *Golden Research Thoughts*. Volume – 4. Issue 4. October 2014. पृ. क्र. ३.

[9] कदम, मीना. *नव्वदीनंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तनवादी विचार: एक अभ्यास*.(प्रबंध) जानेवारी २०१८. पृ. क्र. २९.

[10] ठाकूर, रवींद्र. *साहित्यिक आनंद यादव*. बळीवंश प्रकाशन, नांदेड. २०११. पृ. क्र. २३.

[11] हातकणंगलेकर म. द. *मराठी कथा: रूप आणि परिसर*. श्रीविद्या प्रकाशन, पुणे. २००८. पृ. क्र. ४६.

[12] कदम, मीना. *नव्वदीनंतरच्या ग्रामीण कथेतील परिवर्तनवादी विचार : एक अभ्यास*.(प्रबंध) जानेवारी २०१८. पृ. क्र. ३१.

[13] लोमटे, आसाराम. *इडा पिडा टळो*. पठारे रंगनाथ. देशमुख आणि कंपनी, पुणे. २००८. मलपृष्ठ.

[14] गजेंद्रगडकर, मोनिका. *आर्त*. मौज प्रकाशन गृह, मुंबई. २००८. पृ. क्र. ४१.

[15] गजेंद्रगडकर, मोनिका. *त्रिपर्ण*. मौज प्रकाशन गृह, मुंबई. २००८. पृ. क्र. १००.

[16] रायकर, गजानन. *नातालीन*. शब्दालय प्रकाशन. २००५. पृ. क्र. १२.